# दर शनी रविवारी....(साल-मेरा जूता है जपानी



दर शनी रविवारी, चौपाटीच्या नाक्यावरी
जातो स्कूटरवर बसून, मारतो लाईन पोरींवरी
दर शनी रविवारी.......

आहे मी हिरो रुपारेलचा, शोक मला सिनेमाचा
सौंदर्याचा नेहमी भुकेला, शाहीर मी प्रेमाचा
डिम्पल काजल अन् माधुरी, स्वप्नी येती माझ्या घरी
गाणी प्रेमाची त्या गात, घट्ट मिठ्या मला मारी
दर शनी रविवारी.....

पार्क शिवाजी मधुर मनोहर, सतत येथे हो रहावे
लावण्याचे फिरते प्रदर्शन , दाद देत हो बघावे
आल्या वीणा आणि मीना, तोल डोळ्यांचा राहीना
काय बघावे कळेना, काय बोलावे सुचेना
दर शनी रविवारी.....

( पुढील पानावर चालू--)

ही तर साधना पाटकरांची, कॉलेज क्वीन विलसनची
टॉप फिगर अन् सुंदर मुखडा, जळमळ होई जिवाची
देवा पाव माझ्यावरी, कर अस काहीतरी
माझ्याकडे ती बघून, गोड हासेल कधीतरी
दर शनी रविवारी.....

*सुहास पै*

*ताजा कलम...*

*'गोड गळ्याच्या' लोकांसाठी, ह्या अंकाच्या 'कर्णमाधुरी' सेक्शन मध्ये ह्या गाण्याची केरीओकी. 'चौपाटीच्या नाक्यावरी ' खास उपलब्ध आहे. त्याचा जरूर लाभ घ्यावा.*